**सं.फौ.ख.क्र. ३२०/२०२२**
**निशाणी क्र. १२**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. २ यांचा सरतपास शपथेवर.**

**नाव:** लक्ष्मण पोपट साळवे,

**वय:** ३५ वर्षे, **व्यवसाय:** पोलिस हवालदार ब. नं. ३६३,

**सध्या नेमणूक:** इंदापूर पो. स्टे., ता. इंदापूर, जि. पुणे.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील ॲड श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**

दिनांक ०७/०२/२०२० रोजी मी वालचंदनगर पोलिस स्टेशनमध्ये पोलिस शिपाई म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी पोलिस चौकीत हजर असताना स. पो. नि. पवार यांना गुप्त हेरामार्फत माहिती मिळाली की, मौजे काझड गावच्या हद्दीत ललीता भारती या त्यांच्या घराच्या आडोशास दारू विकत आहेत अशी बातमी मिळाली. पवार यांनी बातमीचा आशय मला, एस. आय. माने. व शिंदे यांना समजावून सांगितला. त्यांनतर आम्ही खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो. घटनास्थळी आम्ही पोहोचलो असता ललीता भारती त्यांच्या घराच्या आडोशास दारू विक्री करित असताना आढळून आली. आमची चाहूल लागताच आरोपी पळून गेली. आरोपीचा शोध घेतला असता ती मिळून आली नाही. त्या ठिकाणी मस्तानी संत्रा देशी दारूच्या १४ बाटल्या असा एकूण रक्कम रूपये ७२८/– किंमतीचा माल मिळून आला. पंचनामा केला. त्यानंतर मी पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली. आता मला फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. १३** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. पी. जी. जगताप यांचे मार्फत शपथेवर**

२. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्या खाजगी वाहनाने छापा टाकण्याकरिता गेलो होतो त्या खाजगी वाहनाचा मला वाहन क्रमांक, मालकाचे नाव, चालकाचे नाव सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा घर नंबर, चतु:सिमा सांगता येत नाही. घटनास्थळाचा छापा टाकून सायंकाळी ७:०० वाजता परत आलो. त्यानंतर ८:०० वाजता मी फिर्याद दिली. त्या दिवशी मौजे

**सं.फौ.ख.क्र. ३२०/२०२२**
**निशाणी क्र. १२**

काझड गावामध्ये एकच छापा टाकला. आरोपी महिला आहे. छापे टाकतेवेळेस आम्ही चारजण होतो. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला आरोपी मिळून आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मौजे काझड गावच्या राजकारणामुळे खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मला माल मिळून आला नाही. मी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

JYOTI NITIN BHASME
Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2024.03.20 17:54:21 +0530

(जे. एन. भस्मे)

दिनांक १९/०३/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.